पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या
सर्व टप्प्यावर लागू करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब
मंत्रालय , मुंबई -४०० ०३२
दिनांक : २५ मे, २००४

**पहा** :- १) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी १०७२/जे,दिनांक २३ मे १९७४
२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०७४ /डी ,
दिनांक २८ जानेवारी १९७५.
३)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०८९/२५५१ (अ) / १६ब.
दिनांक २३ जानेवारी १९९१.
४)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६ब,
दिनांक १८ ऑक्टो. १९९७.

**प्रस्तावना :-** मागासवर्गीय अधिकारी /कर्मचारी यांना पदोन्नतीमध्ये शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - बीसीसी १०७२/जे. दिनांक २३ मे १९७४ अन्वये आरक्षणाचे तत्व लागू करण्यात आले होते. तसेच शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०७४/डी , दिनांक २८ जानेवारी १९७५ अन्वये कनिष्ठ स्तरावरुन वरीष्ठ स्तरावर पदोन्नती देताना पाळावयाची तत्वे विशद केलेली असून या शासन निर्णयान्वये वर्ग १ च्या पहिल्या पदापर्यंतची (पहिल्या टप्प्यापर्यंत ) पदोन्नती. ही " योग्यतेनुसार वरिष्ठता " ( seniority subject to fitness) या तत्वावर मागासवर्गीयांकरीता असलेले आरक्षण विचारात घेवून करण्याबाबत आदेश होते. या शासन निर्णयानुसार वर्ग-१ च्या पहिल्या पदानंतरची (पहिल्या टप्प्यानंतरची ) पदोन्नती "काटेकोर निवड" पध्दतीद्वारे (By strict selection ) करण्याबाबत आदेश दिलेले असून, त्यानुसार वर्ग १ च्या पहिल्या पदानंतरच्या पुढील पदांना / टप्प्यांना आरक्षणाचे तत्व लागू केलेले नव्हते. याशिवाय शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - बीसीसी १०८९/२५५१ (अ) /१६ ब ,दिनांक २३ जानेवारी १९९१ अन्वये ज्या सेवा / संवर्गा मध्ये सरळसेवा भरतीचे प्रमाण ७५ % पेक्षा अधिक नाही, अशा सेवा /संवर्गामधून पदोन्नतीसाठी आरक्षण विहीत करण्याबाबत आदेश दिलेले होते. म्हणजेच ज्या सेवा/ संवर्गामध्ये सरळ सेवाभरतीचे प्रमाण ७५ % पेक्षा अधिक होते अशा वर्ग ४ ते वर्ग १ च्या पहिल्या टप्प्यापर्यंतच्या पदांमध्ये पदोन्नती करीता आरक्षण लागू नव्हते.

२. सद्य:स्थितीत महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २९/१/२००४ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेनुसार सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ मधील (आरक्षण कायदा) कलम ५ मध्ये खालील प्रमाणे तरतूदी केलेल्या आहेत.

**(अ) कलम ५ पोटकलम (१) पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर असेल.**

**(ब) पोटकलम (२) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास , पदोन्नतीद्वारे भरावयाच्या कोणत्याही पदासाठी आरक्षणाची तरतूद करणारे शासनाचे आदेश अंमलात असल्यास, शासनाकडून त्यामध्ये फेरफार करण्यात आला नसेल किंवा ते रद्द करण्यात आले नसतील तर ते अंमलात असल्याचे चालू राहतील.**

३. सध्या प्रचलित असलेल्या दिनांक २३ मे १९७४, २८ जानेवारी १९७५ व २३ जानेवारी १९९१ चे शासन निर्णय अधिक्रमित करुन आता नव्याने लागू केलेल्या वरील अधिनियमाच्या कलम ५ पोटकलम (१) व (२) च्या अनुषंगाने खालील प्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**<u>शासन निर्णय :-</u>**

(अ) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ मधील (आरक्षण कायदा) च्या कलम ५ मधील पोटकलम (१) नुसार जेथे पदे पदोन्नतीने भरली जातात तेथे आरक्षणाचे तत्व लागू होईल. त्यानुसार दिनांक २३/१/१९९१ च्या शासन निर्णयातील तरतूद रद्द करुन सरळ सेवेचे प्रमाण ७५ % पेक्षा अधिक असले तरीही उर्वरीत पदोन्नतीच्या पदांना आरक्षण लागू राहील.

(ब) पदोन्नतीमधील आरक्षण हे खालीलप्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| १)अनुसूचीत जाती | १३ % |
| २)अनुसूचीत जमाती | ७ % |
| ३)विमुक्त जाती (अ) | ३ % |
| ४)भटक्या जमाती ( ब) | २.५% |
| ५)भटक्या जमाती (क) | ३.५% |
| ६)भटक्या जमाती (ड) | २ % |
| ७)विशेष मागास प्रवर्ग | २ % |
| एकूण | ३३ % |

-३२४५ -३२४५ -३२०९

(क) जेथे पदोन्नतीकरीता सेवा प्रवेश नियमात तरतूद आहे तेथे पदोन्नती करीता अद्यापपर्यंत ज्या टप्प्यांना व संवर्गांना आरक्षण लागू नव्हते, आता त्या पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांना / संवर्गांना आरक्षणाचे तत्व दिनांक २९/१/२००४ पासून लागू होईल.

(ड) जे मागासवर्गीय अधिकारी वर्ग १ च्या वरील टप्प्यात दिनांक २९/१/२००४ या तारखेपर्यंत पदोन्नत झालेले आहेत ते सर्व सेवाजेष्ठता व गुणवत्तेनुसार झाले आहेत असे समजण्यात यावे .

(इ) या अधिनियमातील तरतुदीनुसार पदोन्नतीने भरण्यात येणारी आरक्षणाची पदे यापुढे रिक्त होणा-या पदांच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने भरण्यात यावीत.

(फ) नव्याने आरक्षण लागू केलेल्या संवर्गांना / पदांना सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांकः बीसीसी -१०९७/प्र.क्र. ६३/९७/१६-ब , दिनांक १८/१०/१९९७ च्या शासन निर्णयातील आरक्षणा संबंधीचे आदेश लागू राहतील. मात्र ज्या संवर्गात नव्याने आरक्षण लागू करण्यात येणार आहे त्या संवर्गातील मंजूर पदांवर एकाच वेळी आरक्षण न लावता त्या संवर्गातील दिनांक २९/१/२००४ पासून रिक्त होणा-या पदांवरील टक्केवारी विचारात घेवून आरक्षणाची पदे विचारात घ्यावीत.

(ग) दिनांक २९/१/२००४ पूर्वी सुरु केलेल्या निवड प्रक्रियेमध्ये वर्ग १ च्या पुढील टप्प्यामध्ये तसेच ज्या पदोन्नतीच्या टप्प्यांना आरक्षण लागू नव्हते अशा पदोन्नतीच्या टप्प्यांमध्ये सदर अधिनियमाच्या तरतूदी लागू होणार नाहीत. मात्र दिनांक २९/१/२००४ च्या नंतरच्या निवड प्रक्रियेमध्ये अधिनियमातील तरतूदीनुसार आरक्षणाचे तत्व लागू राहिल.

४. वरील आदेश मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांच्या निदेर्शनास आणून वरील आदेशांची योग्य अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( यु.पी.एस मदान )
सचिव

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव